# प्रेस नोट

कॅम्प : शासकिय विश्रामगृह,
चांदुर रेल्वे, जि.अमरावती
दिनांक : १८/१२/२०१९

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुददा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | आलोसे प्रमोद नारायणराव चारथड, वय ५० वर्षे, पद : ग्रामविकास अधिकारी, ग्राम पळसखेड, ता.चांदुर रेल्वे, जि.अमरावती यांचे श्री.विष्णुनगर, प्लॉट नं.५, नवसारी बस स्टॉप, व्हि.एम.व्ही.रोड, अमरावती |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | दिनांक १८.१२.२०१९ चे १६..२० वा. ते १७.१५ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केलेली रक्कम | १,००,०००/— रुपये |
| ५ | स्विकारलेली रक्कम | ४०,०००/— रुपये |
| ६ | घटनास्थळ | तहसिल कार्यालय, चांदुर रेल्वे, जि.अमरावती |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार यांनी दिनांक २५.०९.२०१९ रोजी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ०७.१०.२०१९ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान तक्रारदार यांना ग्रामपंचायत पळसखेड येथील एल.ई.डी.स्ट्रीट लाईटचे केलेल्या कामाचे एम.बी.बुक जिल्हा परिषद, अमरावती येथे पाठविणेकरीता व त्यानंतर चेक देणेकरीता ग्रामविकास अधिकारी श्री.पी.एन.चारथड यांनी १,००,०००/— रु ची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दिनांक १८/१२/२०१९ रोजी आयोजित सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे प्रमोद नारायणराव चारथड, वय ५० वर्षे, पद : ग्रामविकास अधिकारी, ग्राम पळसखेड, ता.चांदुर रेल्वे, जि.अमरावती यांनी तक्रारदार यांना तहसिल कार्यालय, चांदुर रेल्वे येथे बोलावून त्यांचे एम.बी.बुक परत देणेकरीता तक्रारदार यांचेकडून तडजोडीअंती ४०,०००/— रुपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असुन ताब्यात घेण्यात आले आहे. नमुद आरोपीविरुध्द पो.स्टे.चांदुर रेल्वे, जि.अमरावती येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही श्री.श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती श्री.पंजाबराव डोंगरदिवे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पोलीस उपअधीक्षक गजानन पडघन, पो.हवा. चंद्रशेखर दहेकर, पो.ना.सुनिल व—हाडे, युवराज राठोड, पो.कॉ.अभय वाघ, पो.कॉ.महेंद्र साखरे, चालक पो.ना.चंद्रकांत जनबंधु यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क** : अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, पराजपे कॉलनी, अमरावती
ऑफीस फोन नं.०७२१—२५५२३५५, २५५३०५५
टोल फ्रि नंबर —१०६४

(गजानन पडघन)
पोलीस उपअधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
मो.नं.९९२३७३८१००

Scanned by CamScanner